जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११
अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत
(सर्वसाधारण योजना)
वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०१०/प्र.क्र.३४०/पदुम-४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ३० ऑगस्ट, २०१०**

**वाचा** - १. शासन निर्णय क्र.एलव्हीएस-१०९८/१४७६९/१०४/पदुम-४, १४/०७/१९९८
२. शासन निर्णय क्र.सीडीएस-१०९९/२२३२३/के.नं.८७/९९/पदुम-३, दि.१५.१२.१९९९
३. शासन निर्णय क्र.एफडीआर-२०००/१७६७७/प्र.क्र.९६/पदुम-३, दि.१८.११.२०००.
४. शासन नियोजन विभागाचे पत्र क्र.जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१
दिनांक ३० डिसेंबर, २००९.

**शासन निर्णय -**

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत कालवडी व सुधारित म्हशींच्या पारड्यांची जोपासना, अर्थसहाय्य, देशी गोवंशांची जपणूक व संवर्धन अंतर्गत देवणी जातीच्या कालवडींना खाद्य अनुदान व शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी शेतकऱ्यांना उत्तेजित करण्यासाठी १००% अनुदानावर बियाणे वाटप या योजने संदर्भ क्र.१,२ व ३ वरील शासन निर्णय अधिक्रमित करून **जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम** ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास याद्वारे शासनाची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**अ. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप**

राज्यातील वैरण उत्पादनामधील कमतरता काही प्रमाणात भरून काढण्याकरिता तसेच पशुपालकांकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढविणे व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त दुग्ध उत्पादनासाठी पशुपालकाकडे असलेल्या पशुधनाला पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर वैरणीचे उत्पादन घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरणीचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर कार्यक्रम राबविण्यात यावा.

१. या अंतर्गत वैरण बियाण्यांचा पुरवठा करतांना लाभार्थींकडे वैरण उत्पादनासाठी स्वतःची शेतजमीन व सिंचनाची सुविधा असणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, लुसर्न व इतर बियाणे तसेच नेप्पियर, यशवंत, जयवंत इ. सुधारित बहुवर्षिय गवत प्रजातींची ठोंबे वाटप करावीत.

२. ज्या लाभार्थीकडे स्वतःची किमान ३ ते ४ जनावरे आहेत अशा लाभार्थींना प्राधान्य द्यावे.

३. प्रति लाभार्थी एक एकरच्या क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी १००% अनुदानावर रू ६००/- च्या मर्यादेत वैरणीच्या बियाणांचा/ठोंबाचा पुरवठा करण्यात यावा.

४. खात्याने केलेल्या दर करारानुसार वैरणीचे बियाणे व ठोंबांची खरेदी करून पुरवठा करण्यात यावा. खात्याचा दरकरार उपलब्ध नसल्यास राष्ट्रीय बियाणे महामंडळ, राज्य बियाणे महामंडळ (महाबिज), इतर शासकीय संस्था, कृषि विद्यापिठे/महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची प्रक्षेत्रे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळा कडील प्रक्षेत्रे यांच्याकडून विहित शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करून वैरणीचे बियाणे/ठोंबांची खरेदी करण्यात यावी.

५. वैरण बियाण्यांचे वाटप करण्यापूर्वी लाभार्थींना वैरण पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे.

६. वैरण बियाणे वाटप करतांना हंगामानुसार पिकांची निवड करावी.

७. वैरणीच्या पिकां/ठोंबाकरिता आवश्यक खते, जिवाणू संवर्धके शेतकऱ्याने स्वतःच्या खर्चाने खरेदी करावीत.

८. या कार्यक्रमा अंतर्गत कोणत्याही प्रवर्गातील शेतकऱ्यांना लाभ घेता येईल. तसेच एका लाभार्थीला एका हंगामात एकदाच लाभ देण्यात येईल.

**ब. विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/देशी गोवंशीच्या कालवडी, सुधारीत/देशी म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य**

१. पशुपालकाकडील संकरित/देशी कालवडी व सुधारित/देशी म्हशीच्या पारडया शास्त्रोक्त पध्दतीने जोपसण्यासाठी सकस खाद्य देऊन तसेच पशुपालकांना प्रशिक्षित करुन अधिक उत्पादन देणा-या संकरित गायी व सुधारित म्हशींची निर्मिती करणे हा या कार्यक्रमाचा उद्येश आहे. सदर कार्यक्रमा अंतर्गत पशुखाद्याच्या स्वरुपात अल्प भूधारक, अत्यल्प भूधारकास व भूमिहीन शेतमजूरांस ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य देणे व पशुपालकांचे संकरीत/देशी कालवडी/ सुधारीत/देशी पारड्यांचा विमा या बाबींचा अंतर्भाव करण्यात यावा.

२. लाभार्थीकडील संकरीत/देशी कालवडीचा तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ३२ महिन्यापर्यन्त व सुधारित/देशी पारडीला तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासून ते ४० महिन्या पर्यन्त पशुखाद्याच्या स्वरुपात ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरविण्यात यावे. कालवडीस /पारडीस ज्या वयापासून खाद्य देणे सुरु होईल त्या तारखेपासून दर तीन महिन्याने खाद्य पुरवठा करणेत यावा.

३. संकरीत/देशी कालवडी /म्हशींच्या पारड्यांचे खाद्य प्रकरणी परिशिष्ठ-२ मध्ये दर्शवील्या प्रमाणे खाद्य पुरवठा करणे आवश्यक असेल त्या मध्ये एकूण खाद्याच्या किमतीच्या ५० टक्के अनुदान असेल व ५० टक्क्याची रक्कम लाभार्थीकडून वसूल करावी व खाद्य पुरवठा करावा.

४. भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणकानुसार खाद्यामध्ये मॉइश्चरचे प्रमाण १० टक्के, क्रुड प्रोटीनचे प्रमाण २० टक्के, क्रुड फायबरचे प्रमाण १३ टक्के, क्रुड फॅटचे प्रमाण २.५ टक्के, ॲसिड इन्सोल्यूबल ॲश ४ टक्के, सॉल्टचे प्रमाण २ टक्के, कॅलशियमचे प्रमाण ०.५ टक्के, फॉस्फरसचे प्रमाण ०.५ टक्के प्रमाणे असणे आवश्यक आहे.

५. क्षार मिश्रण, अ. जीवनसत्व, कृमिनाशके इ. चा पुरवठा तसेच लाळखुरकुत लसीकरण करण्यासाठी इतर योजने अंतर्गत उपलब्ध पुरवठ्यातून सदरील कालवड/ पारडीस प्राधान्य देण्यात यावे.

६. सदरील योजने अंतर्गत कालवडीचा / पारडीचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. लाभार्थीकडून विमा हप्त्याची रक्कम वसूल करुन नंतरच विमा अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी. विमा हप्त्याच्या ५० टक्के रक्कम शासन अनुदान राहील. या अनुदानाची कमाल मर्यादा रू.३००/- एवढी राहील. विम्याचा कालावधी सलग ३ वर्षाचा असावा.

७. एका कुटूंबातील एका कालवड/पारडीसाठी योजनेत लाभ देण्यात यावा. पशुखाद्य व विम्यासाठी एका कालवडी करिता अनुदानाची मर्यादा रू १०,०००/- व एका पारडीसाठी अनुदान मर्यादा रू १२,५००/- राहील.

८. अनुसुचित जाती, जमाती (मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधारक) यांना प्राधान्य देण्यात यावे.

९. खात्याच्या दरकरारानुसार पशुखाद्य खरेदी करून पुरवठा करण्यात यावा. ज्या वेळी दर करार उपलब्ध नसेल अशा वेळी विहित शासकीय कार्यप्रणालीचा अवलंब करून पशु खाद्याची खरेदी करण्यात यावी.

प्रस्तुत योजना राबवण्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त करून घेणे योजनांतर्गत प्रस्ताव मंजूर करणे व प्रत्यक्ष निधी वितरणा करिता खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१. या योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी विशिष्ट कालावधी निर्धारित करून शेतकऱ्याकडून पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार यांचे स्तरावर अर्ज मागविण्यात यावेत (परिशिष्ट क्र.१ प्रमाणे) प्राप्त झालेल्या अर्जाची दिनांक निहाय नोंद पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती (विस्तार) यांनी ठेवावी व प्राप्त झालेले सर्व अर्ज शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

२. योजनेचे अर्ज तालुका पशुसंवर्धन कार्यालयात, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालय व वेबसाईटवर उपलब्ध असावे.

३. या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड खालील समितीद्वारे करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | अध्यक्ष |
| २. | जिल्हा महिला व बालकल्याण विकास अधिकारी | सदस्य |
| ३. | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ५. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

४. या योजने अंतर्गत ३०% महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा.

५. शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि. १६/२/२००८ नुसार प्रशासकीय मंजूरी जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी.

६. सदर योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरिता अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

७. या योजने अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनोत्तर) या बाबीखाली जिल्हा नियोजन समितीकडे निधी प्रस्तावित करावा.

८. या योजनेचा वार्षिक फलश्रुती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६०१९/१४३१, दि. १३.८.२०१० अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९८/१०/व्यय-२, दि. २४.८.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०१००८३११३३९४४००१ आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

**(डॉ. मा.ना. सवाईसोनकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत -

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग (व्यय-२),मंत्रालय,मुंबई
अवर सचिव पदुम-३/१६, कक्ष अधिकारी पदुम-१/१अ, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवड नस्ती

परिशिष्ठ - २

| | | |
|---|---|---|
| ४ था महिना | १ किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ३० किलो |
| ५ वा महिना | दिड किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ४५ किलो |
| ६ वा महिना | पावणे दोन किलो प्रतिदिन प्रमाणे एक महिन्यासाठी | ५५ किलो |
| ७ वा महिना ते १८ महिने पर्यन्त | दोन किलो प्रतिदिन प्रमाणे १२ महिन्यासाठी | ७२० किलो |
| १९ वा महिना ते ३२ महिन्यापर्यन्त | अडिच किलो प्रतिदिन प्रमाणे १४ महिन्यासाठी | १०५० किलो |
| **कालवडीसाठी एकूण खाद्य** | | **१९०० किलो** |
| ३३ वा महिना ते ४० महिने पर्यन्त म्हशीच्या पारडीसाठी | अडीच किलो प्रतिदिन प्रमाणे ८ महिन्यासाठी | ६०० किलो |
| **पारडीसाठी एकूण खाद्य १९०० किलो + ६०० किलो** | | **२५०० किलो** |

परिशिष्ट-3

**विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/देशी कालवडी व सुधारीत/देशी म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य योजनेच्या अर्जाचा विहित नमुना**

साक्षांकीत छायाचित्र

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद)

------------------------------------------

**विषय: ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरवठ्याबाबत मागणी अर्ज.....**

अर्जदाराचे नाव:------------------------------------ (पुरूष/स्त्री)

पत्ता:------------------------------- गाव: ------------------ तालुका: -------------------------

जिल्हा: ----------------------------

वर्ग: अनुसुचीत जाती/ अनूसुचीत जमाती/अल्पभूधारक/अत्यल्पभूधारक/सर्वसाधारण

अर्जदाराकडे उपलब्ध शेती: बागायती------- हे., जिरायती--------हे.

अर्जदाराकडे उपलब्ध जनावरे: दुभती-------- ईतर---------

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/देशी कालवडी व सुधारीत/देशी म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य योजना या पशुसंवर्धन विभागाच्या योजनेतंर्गत ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य मिळण्यासाठी मी खालील सही करणार अर्ज करीत आहे. माझेकडे वर नमुद उपलब्ध जनावरांपैकी ------ संकरीत/देशी गायीची कालवडी/ सुधारीत/देशी जातीची म्हशीची पारडी असुन तिचे वय -------- आठवडे आहे. उपरोक्त योजनेसाठी प्राप्त होणारे पशुखाद्य, मी माझ्या मालकीच्या संकरीत/देशी गायीची कालवडी/ सुधारीत/देशी जातीची म्हशीची पारडी साठीच वापरणार आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही

(नाव:---------------------------)

## पशुसंवर्धन विभागाचे शिफारसपत्र

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका लघु पशुचिकीत्सालय/पशुधन विकास अधिकारी/(पंचायत समिती)/............ शिफारस करतो, की विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत/देशी कालवडी व सुधारीत/देशी म्हशीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य योजना या योजनेतंर्गत श्री.................................यांच्या अर्जातील माहितीची खात्री केली असून त्यांच्याकडे एकूण पशुधन...............असून पैकी ............ दुभती..................व इतर..... जनावरे आहेत सदर जनावरांपैकी त्यांचेकडे ------ संकरीत/देशी गायीची कालवडी/ सुधारीत/देशी जातीची म्हशीची पारडी असुन तिचे वय -------- आठवडे आहे. त्यांना सदर योजनेमधुन ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरवठा करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन/

पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती